अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | बुधवार, दि. ४ जानेवारी २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : ९९ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८


## रोमांचक सामन्यात भारताचा दोन धावांनी विजय

**मुंबई :** शिवम मावीच्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर पहिल्या टी२० सामन्यात भारताने दोन धावांनी विजय मिळवला. पदार्पणाच्या सामन्यात शिवम मावीनं चार बळी घेत भारताच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. भारतानं दिलेल्या १६३ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना श्रीलंकेचा संघ २० षटकांत १६० धावांपर्यंत पोहोचला. शिवम मावीने चार तर उमरान मलिक आणि हर्षल पटेल यांनी प्रत्येकी दोन दोन बळी घेतले.

भारताने दिलेल्या आव्हानाचा पाठलाग करताना श्रीलंकेची सुरुवात निराशाजनक झाली. १२ धावांवर त्यांना पहिला धक्का बसला. सलामी फलंदाज निसांका अवघ्या एका धावांवर बाद झाला. त्यानंतर २४ धावांवर दुसरी विकेट गेली तर ५१ धावांत श्रीलंकेचे चार फलंदाज तंबूत परतले होते.



भारताच्या भेदक गोलंदाजीपुढे श्रीलंका संघाचे ठरावीक अंतरावर विकेट पडत गेल्या. श्रीलंकेकडून कर्णधार दसुन शनाकाने सर्वाधिक ४५ धावांची खेळी केली. त्याशिवाय वानंदु हसरंगा २१, चामिरा करुनार्त्ने २३ तर कुसर मेंडिसने २८ धावांची खेळी केली. पण संघाला विजय मिळवून देण्यात अपयश आले. दीपक हुड्डा आणि अक्षर पटेल यांनी मोक्याच्या क्षणी भारताची धावसंख्या वाढवली. दीपक हुड्डानं २३ चेंडूत ४१ धावांची खेळी केली. तर अक्षर पटेलनं २० चेंडूत ३१ धावांची खेळी केली. इशन किशननं २९ चेंडूत ३७ धावांची खेळी केली. तर हार्दिक पांड्यानं २७ चेंडूत २९ धावांची खेळी केली.

# असेल हिंमत तर या लोकात; कळेल किंमत

## देवस्थानशी संबंध नाही, चिमणी बेकायदेशीरच : आ.विजयकुमार देशमुख

**सुराज्य/सोलापूर**

**'केवळ समाजाचे आणि भावनिक राजकारण करत दुसऱ्यावर आरोप करण्यापेक्षा थेट मैदानातच या, तरच तुमची विश्वासार्हता आणि किंमत जनतेला कळेल', असे प्रतिआव्हान आ. विजयकुमार देशमुख यांनी सिध्देश्वर कारखान्याचे माजी चेअरमन धर्मराज काडादी यांना देत 'चिमणी बेकायदेशीरच आहे' असे ठणकावून सांगितले.**



गेल्या दोन-तीन महिन्यांपासून सिध्देश्वर कारखान्याच्या चिमणीवरून कारखाना व्यवस्थापन आणि सोलापूर विकास मंचमध्ये घमासान चालू आहे. असे असताना धर्मराज काडादी यांनी शेतकऱ्यांसमवेत काढलेल्या मोर्चामध्ये थेट आ. विजयकुमार देशमुख यांच्यावर अप्रत्यक्ष टिका करताना यामागे त्यांचाच हात असल्याचे सांगत उत्तरचे नेतृत्व बदलावे, असे आवाहन केले होते. त्यावेळी आ. विजयकुमार देशमुख नागपूर अधिवेशनात होते, त्यांनी सोलापुरात आल्यावर यावर उत्तर देऊ असे सांगितले होते. त्यामुळे आ. देशमुख काय बोलणार याची उत्सुकता सर्वांना होती. अखेर त्यांनी यावर काडादी यांना खुले आव्हान देत 'तुम्ही मैदानातच या, लोकांमध्ये आल्यावर तुम्हाला किंमत कळेल', असे स्थानिक वृत्तवाहिनींशी बोलताना ठणकावून सांगितले.

आ. देशमुख म्हणाले, श्री सिध्देश्वर सहकारी साखर कारखान्याची चिमणी ही बेकायदेशीरच आहे. भाजपची सत्ता असताना तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबरोबर बैठक घेऊन आम्ही चिमणी पाडकामाला स्थगिती दिली होती. मात्र त्यानंतर त्यांनी आवश्यक परवानग्या काढणे अपेक्षित असताना तसे न करता उलट त्यांनी भाजपच्या आमदार आणि खासदारांना टार्गेट केले, हा कुठला न्याय आहे? असा सवाल त्यांनी केला. जेव्हा सिध्देश्वर कारखान्याची चिमणी बेकायदेशीरपणे बांधली, त्यावेळी भाजपची सत्ता नव्हती. कागदपत्रे बघितले तर ते सिद्ध होईल. चिमणी बांधताना त्यांनी महानगरपालिकेची, पर्यावरण खात्यांचीही परवानगी काढली नाही, हे चुकीचे आहे.

### देवस्थानचा आणि माझा संबंध नाही

सिद्धेश्वर देवस्थानचा मी पंच नाही. त्यामुळे ते याबद्दल का बोलले मला माहिती नाही. भावनिक विषय करून त्यांनी केलेल्या चुका दुसऱ्याचा अंगावर ढकलण्याचा त्यांच्याकडून सातत्याने प्रयत्न सुरू आहे. तुम्ही चूक केली असेल तर लोकांसमोर जाऊन कबूल करायला हवी, असेही आ. देशमुख म्हणाले.

### विनाकारण टार्गेट करु नये

मी अथवा भाजपचा कोणताही कार्यकर्ता ही चिमणी बेकायदेशीर आहे म्हणून कोर्टात गेलेला नाही. असे असताना विनाकारण भाजपच्या आमदारांना आणि खासदारांना टार्गेट करणे चुकीचे आहे. तुम्ही कोणत्याच बाबीची परवानगी घेतली नाही; यात आमची चूक नाही. त्यामुळे तुम्ही दुसऱ्यावर आरोप करण्यापेक्षा समोर येऊन राजकारण करा, असेही आ.विजयकुमार देशमुख म्हणाले.

### कोणाच्या सांगण्यावरून मंत्रिपद मिळत नाही

भाजप कोणाचेही ऐकून कोणाला मंत्रिपद देत नाही. येथे कामावर मंत्रिपद मिळते. काडादी यांनी चुकीचे काहीतरी सांगून गैरसमज पसरवू नये. मी विकासकामे केली म्हणून जनतेमधून चारवेळा निवडून आलो आहे, जनतेचाही माझ्यावर विश्वास आहे, त्यामुळे मला राज्यात मंत्रिपद मिळाले, असेही आ. विजयकुमार देशमुख म्हणाले.

### पवार, शिंदेंनी तुम्हाला का मदत केली नाही?

राज्यात महाविकास आघाडीची अडीच वर्षे सत्ता असताना खा. शरद पवार, सुशीलकुमार शिंदे अथवा रोहित पवार या लोकांनी तुम्हाला का मदत केली नाही? चिमणी कायदेशीर का केली नाही? असा सवाल आ. देशमुख यांनी केला. बेकायदेशीर कामाला आमदार आणि खासदारांनी काय मदत करावी? याचे उत्तर काडादी यांनी द्यावे, असेही आ. देशमुख म्हणाले.

## अखेर प्राथमिक शिक्षण मंडळाला मिळाला पूर्णवेळ अधिकारी

**हनुमंत जाधवर यांनी घेतला पदभार**

**सुराज्य/सोलापूर**

महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाला अखेर नऊ महिन्यानंतर पूर्णवेळ प्रशासन अधिकारी मिळाला आहे. प्रशासन अधिकारिपदी पदोन्नतीने हनुमंत जाधवर यांची शासनाने नियुक्ती केली आहे. नुकताच त्यांनी पदभारही घेतला आहे. सोलापूर महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे तत्कालीन प्रशासन अधिकारी कादर शेख यांची मार्च २०२२ मध्ये पदोन्नतीने बदली झाली होती.



त्यानंतर अद्यापपर्यंत प्रभारी प्रशासन अधिकारी म्हणून महापालिका जि.प.चे प्राथमिक उपशिक्षणाधिकारी संजय जावीर यांच्याकडे प्रभारी प्रशासन अधिकारी पदाचा कार्यभार सोपविण्यात आला होता. नऊ महिने संजय जावीर यांनी प्रभारी प्रशासन अधिकारी म्हणून काम पाहिले. शिक्षकांच्या बदलीचे धोरण निश्चित करण्याबरोबरच विविध चांगले निर्णय घेऊन शिस्त लावण्याचा त्यांनी केला होता. मात्र ते प्रभारी असल्याने पूर्ण वेळ अधिकारी कधी मिळणार असा सवाल उपस्थित होत होता. अखेर नऊ महिन्यानंतर का होईना महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळास पूर्णवेळ प्रशासन अधिकाऱ्याची नियुक्ती शासनाने केली आहे. नूतन प्रशासन अधिकारिपदी हनुमंत जाधवर यांची नियुक्ती केली आहे.

नूतन प्रशासन अधिकारी हनुमंत जाधवर हे यापूर्वी उस्मानाबाद जिल्ह्यातील पाटोदा जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक म्हणून काम पाहिले आहे. तब्बल ३० वर्षे त्यांनी ही सेवा बजावली. त्यानंतर पदोन्नतीने त्यांची इथे प्रशासन अधिकारिपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

## यावलीजवळ कारची लुनाला धडक; एकजण ठार

**सुराज्य/मोहोळ**

सोलापूर पुणे महामार्गावर यावली गावाजवळ संध्याकाळी दूध वाढून घराकडे निघालेल्या दूध उत्पादक शेतकऱ्यास कारने जोराची धडक दिली. यात त्याचा मृत्यू झाला.

याबाबत मोहोळ पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आपल्या लुना एमएच १३ बी.पी.५८७९ या मोटर सायकल वरून दिनकर महादेव सावळे वय ५९ हे दूध वाढून घराकडे परतत असताना भरधाव वेगामध्ये येणाऱ्या टी. एस. ०२ एफई १०२४ या क्रमांकाच्या कारने सावळे यांच्या लुनाला जोराची धडक दिली. यात दिनकर महादेव सावळे हे गंभीर जखमी झाले.

त्यांना नूतन महिला सरपंचचे पती सिध्देश्वर राऊत यांनी तातडीने ॲम्ब्युलन्स बोलावून मोहोळ ग्रामीण रुग्णालयात दाखल केले परंतु त्यांचा मृत्यू झाला होता. ही घटना मंगळवारी संध्याकाळी साडेआठ वाजणेच्या सुमारास घडली. याबाबत कारचालक वेणुपल्ली शंकरय्या वेनवंका करीमनगर तेलंगणा याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे या घटनेचा तपास मोहोळ पोलीस करीत आहेत.

## सासू, पत्नी, दोन मेहुणींच्या त्रासाला कंटाळून जावयाची आत्महत्या

**पंढरपूर :** सासू, पत्नी, दोन मेहुणी, मेव्हण्याच्या त्रासाला कंटाळून विशाल धोत्रे याने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. आत्महत्या करण्यापूर्वी सासू, दोन मेहुण्या यांना माझ्या मृत्यूस जबाबदार धरावे, असा व्हिडिओ तयार करून त्याने आत्महत्या केली आहे.



याप्रकरणी सासू, दोन मेव्हण्या तसेच त्याच्या पत्नीला पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार विशाल धोत्रे याचे पंधरा वर्षांपूर्वी नरखेडच्या वैशाली देवकर हिच्याशी विवाह झाला होता. विवाहानंतर दोघांमध्ये वाद-विवाद होत होते. विशाल धोत्रे याला आपली पत्नी वैशालीचे अमोल धोत्रे यांच्याशी भेटणे आणि बोलणे चालू असल्यामुळे त्यांच्या दोघात सातत्याने भांडणे होत होती. भांडण करून माहेरी गेलेल्या बायकोला आणण्यासाठी गेलेल्या विशालला सासू रेखा चांगदेव देवकर, पत्नी वैशाली विशाल धोत्रे, अमोल दादा धोत्रे, मेव्हणा नागेश चांगदेव देवकर, मेव्हणी रेणुका सर्जेराव विटकर, मेहुणी साधना धर्मेश धोत्रे यांच्या त्रासाला कंटाळून विशालने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे, अशी फिर्याद विशालची आई मंगल धोत्रे यांनी पंढरपूर शहर पोलीस ठाण्यात दिली आहे.

विशालने आत्महत्या करण्यापूर्वीचा व्हिडिओ बनवून सासरच्या लोकांना माझ्या मृत्यू जबाबदार धरावे असा व्हिडिओ बनवला होता. यातील संशयित आरोपी रेणुका सर्जेराव विटकर, साधना धर्मेश धोत्रे आणि वैशाली विशाल धोत्रे या तिघींना पोलिसांनी अटक केली आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सोनवलकर करत आहेत.

## २० हजारांची लाच; राज्य उत्पादनाच्या जवानाला कोठडी

**सुराज्य/सोलापूर**

गुन्ह्यातील एका तक्रारदाराला जामीन मिळण्यासाठी सहकार्य केल्याच्या मोबदला म्हणून २० हजाराची लाच मागितल्या प्रकरणी राज्य उत्पादन शुल्कचा जवान मलंग गुलाब तांबोळी (वय ३३ रा.स्वामी विवेकानंद, विजापूर रोड) याला लाचलुचपत प्रतिबंधच्या पथकाने अटक केली.

त्याला ३ दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याच्या आदेश विशेष न्यायालयाने आज मंगळवारी दिला.

मलंग गुलाब तांबोळी हा राज्य उत्पादन शुल्क येथे जवान म्हणून नोकरीस आहे. तक्रारदाराविरुद्ध उत्पादनाच्या पथकाने गुन्हा दाखल केला होता.त्यात त्याला जामीन तसेच गुन्ह्यातून वगळण्याच्या कामास सहकार्य करण्यासाठी मलंग तांबोळी याने तक्रारदारास ३०



हजाराची लाच मागितली होती. तडजोडीत २० हजार रुपये देण्याचे मंजूर झाले होते.

दरम्यान तक्रारदाराने ॲन्टी करप्शन कार्यालयाशी संपर्क साधून तांबोळी याच्याविरुद्ध तक्रार दाखल केली होती. त्याप्रमाणे पथकाने चौकशी करून मलंग तांबोळी याला अटक केली. त्याला ५ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी ठेवण्याचा आदेश न्यायालयाने दिला.

राज्य उत्पादनचे पोलीस निरीक्षक महाडिक, हवालदार प्रमोद पकाले, अतुल घाडगे, उमेश पवार स्वप्निल सन्नके आदींनी ही कामगिरी केली.

## नोकरीचे आमिष दाखवून महिलेची फसवणूक

**सुराज्य/सोलापूर**

नोकरीचे आमिष दाखवून एका महिलेकडून कागदपत्रांवर एग्रीमेंट असल्याचे सांगून ४८ हजार रुपये घेऊन फसवणूक केल्याप्रकरणी चार जणांविरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना दि.१ मे २०२२ पासून ते आजतागायत पर्यंत घडली.

याप्रकरणी वनिता सुरेश पवार (वय-३८, रा.न्यू बुधवार पेठ, फकीरा चौक) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून रावसाहेब रामचंद्र पवार (रा. गावठाण देवापुर, ता.माण, जि.सातारा), दामिनी कुरणे, अंजली व समर्थ कोळी यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. वरील संशयित आरोपी यांनी फिर्यादी वनिता पवार यांना बुरुडकर टॉवर समृद्धी गार्डन येथील इंटरनॅशिया इंडिया मार्केटिंग प्रायव्हेट लिमिटेड या ठिकाणीचे संचालक व साथीदार यांनी संगनमत करून नोकरीचे आमिष दाखवून नोकरी न देता,कपडे खरेदी विक्रीत गुंतवणूक केल्यास त्या गुंतवणुकीवर जास्तीत जास्त कमिशन दिले जाते असे सांगून विश्वासघात करून फिर्यादी यांच्याकडून ४८ हजार रुपये भरून घेतले.




तसेच कागदपत्रावर एग्रीमेंट असल्याचे सांगून सह्या घेऊन फिर्यादी यांना नोकरी न देता व पैसे तसेच त्यांचे कमिशन न देऊन फसवणूक केली आहे असे फिर्यादीत नमूद आहे.घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक देशमुख हे करीत आहेत.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



रेशन?

| कल्याण |
| --- |
| -------- |

| मेन बाजार |
| --- |
| -------- |

## राज्यभरातील निवासी डॉक्टरांचा संप मागे

**सुराज्य/मुंबई**

**मागील दोन दिवसांपासून सुरू असलेला राज्यातील निवासी डॉक्टरांचा अखेर मागे घेण्यात आला. संपकरी निवासी डॉक्टरांच्या शिष्टमंडळाने वैद्यकीय शिक्षण मंत्री गिरीश महाजन यांच्यासोबत मागण्यांबाबत चर्चा केली. या बैठकीत मागण्यांबाबत सकारात्मक चर्चा झाली. त्यानंतर संप मागे घेण्याची घोषणा करण्यात आली.**

यावेळी गिरीश महाजन यांनी सांगितले की, निवासी डॉक्टरांची कोणतीही गैरसोय होणार नाही, याची आम्ही काळजी घेत आहोत. वसतिगृहासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत. सकारात्मक आज आमची चर्चा डॉक्टरांसोबत झाली आहे.

त्यांनी आता संप मागे घेतला असल्याचे महाजन यांनी सांगितले. गिरीश महाजन यांनी सांगितले की, वसतिगृहासाठी केंद्र सरकारकडून ५०० कोटींच्या निधी मागितला आहे. त्याशिवाय, सीएसआर अंतर्गत निधीची मागणी कॉर्पोरेट क्षेत्राकडे करण्यात आली आहे. त्यांनी देखील सकारात्मक भूमिका दर्शवली आहे. दोन दिवसांत एक हजार ४३२ पदे भरली जाणार आहे. या भरतीचा प्रस्ताव याआधीच होता.



त्याला अधिक गती येणार असल्याचे गिरीश महाजन यांनी म्हटले. महापालिका अखत्यारीत असलेल्या रुग्णालयातील निवासी डॉक्टरांच्या प्रश्नांबाबत मुख्यमंत्र्याकडे याची चर्चा करणार असल्याची माहिती गिरीश महाजन यांनी दिली. मार्डने वरिष्ठ निवासी डॉक्टरांच्या १ हजार ४३२ जागांची पदनिर्मिती करण्याची मागणी केली. हा प्रस्ताव शासन दरबारी रखडला आहे. त्याशिवाय वैद्यकीय महाविद्यालये आणि रुग्णालयातील वसतिगृहांची दुरवस्था झाली असून निवासी, प्रशिक्षणार्थी डॉक्टरांची हेळसांड होत असल्याचा आरोप करण्यात येत आहे. सहयोगी आणि सहाय्यक प्राध्यपकांची अपुरे पदे तातडीने भरण्याची मागणीदेखील करण्यात आली होती. त्याशिवाय महापालिका आणि सर्व शासकीय रुग्णालयात महागाई भत्ता आणि थकबाकी तत्काळ लागू करा, वरिष्ठ निवासी डॉक्टरांच्या वेतनातील तफावत दूर करून सर्व निवासी डॉक्टरांना समान वेतन लागू करण्याची मागणी मार्डने केली आहे.

## ऊस घेऊन निघालेला ट्रॅक्टर ट्रॉलीसह उलटला

**सोलापूर :** ऊस घेऊन निघालेला ट्रॅक्टर आणि ट्रॉली अचानक उलटल्याची घटना मरीआई चौकाजवळील रेल्वे पुलाच्या परिसरात घडली.

मंगळवेढा रोडवरून भैय्या चौकाकडे निघालेला उसाचा ट्रॅक्टर रेल्वे पूल परिसरात आल्यानंतर उलटला. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.या घटनेनंतर रेल्वे पुलावर वाहतूक कोंडी झाली होती. ट्रॅक्टरवरील ताबा सुटल्याने पुलावरून ट्रॅक्टर आणि एक पहिली ट्रॉली खाली कोसळली.चालकाने मद्यप्राशन केल्याची चर्चा गर्दीमध्ये ऐकू आली. घटनेची माहिती कळताच पोलिसांनी धाव घेतली.



उलटलेली ट्रॉली त्याच ठिकाणी ठेवून काही वेळानंतर दोन नंबरची ट्रॉली ट्रॅक्टर चालकाने पुढे नेल्याचे सांगण्यात आले. रात्री उशिरापर्यंत पडलेला ऊस उचलण्याचे काम सुरू होते.